**अनुसूचित क्षेत्रातील तेंदूपत्ता आणि आपटा संकलन व विक्रीच्या व्यवस्थापनाबाबत**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पेसा-२०१२/ प्र.क्र.६५/पंरा-२

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४००००१
तारीख: १७ डिसेंबर २०१५.

**वाचा :-**

१. मा.राज्यपाल यांनी जारी केलेली अधिसूचना क्र. RB/TC/e-11019(15)2014/ Notification-3/Bamboo-MFP/741, दिनांक १९/०८/२०१४.
2. मा.राज्यपाल यांनी जारी केलेली अधिसूचना क्रमांक RB/TC/e-11019(15) (2014)/Notification-6/24/2015, दिनांक ९/१/२०१५.
३. ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक पेसा/२०१४-प्र.क्र/६५.पं.रा.-२, दिनांक १९/०१/२०१५ व दि.१६/२/२०१५.

**प्रस्तावना:-**

अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने मा.राज्यपाल महोदयांनी दि.१९.८.२०१४ रोजीच्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ मध्ये सुधारणा केली असुन त्यानुसार अनुसूचित क्षेत्रात गौण वनउपजांच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली आहे. त्यामध्ये बांबु व तेंदू सह सर्व गौण वनउपजांचा समावेश केला आहे. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउपजांची मालकी ग्रामसभेकडे, पंचायतीकडे विहीत करण्यात आली आहे.

दि.३० ऑक्टोंबर २०१४ च्या अधिसूचनेअन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ मध्ये सुधारणा करुन गौण वन उत्पादनासाठी वाहतूक परवाना (Transit Permit) देण्याचे अधिकार ग्रामसभांना देण्यात आलेले आहेत.

२. तेंदू हे विशेष गुणधर्म असलेले गौण वनउत्पादन आहे. तेंदूपत्त्याचे आयुष्यमान अत्यंत कमी असुन अल्प काळात नष्ट होणारे आहे व गोळा करण्याचा कालावधी कमी आहे. त्यामुळे सद्यस्थितीत

गौण उपजांचे मालक या नात्याने अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती, ग्रामसभेला तेंदूपत्ता संकलन व विक्री यांचे यशस्वी व्यवस्थापन करावयाचे आहे.

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा तेंदू पत्त्याचे संकलन, प्रक्रिया साठवणुक व विक्री याचे संक्रमण काळात सुयोग्यरित्या व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ च्या कलम ४ (१) मध्ये मा.राज्यपाल महोदयांनी त्यांच्या दि.९.१.२०१५ च्या अधिसुचनेअन्वये सुधारणा केली असुन ती पुढील प्रमाणे आहे.

"provided that, it shall be lawful for the Forest department upon a requisition made by the resolution of the Panchayat and the Gram Sabha concerned in this regard to purchase, transport, and dispose of Tendu and Apta leaves on their behalf and thereupon the provision of the Maharashtra Forest produce (Regulation of Trade) Act, १९६९ and the rules made thereunder and the guidelines issued in this regard from time to time shall, mutatis mutandis, apply".

वरील अधिसूचनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी व पंचायत आणि ग्रामसभांच्या गौण वनउत्पादनाच्या मालकीच्या संदर्भात कोणतीही तडजोड न करता यांसदर्भातील कार्ये पार पाडण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दिनांक १९ जानेवारी २०१५ व दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजीचे शासन निर्णय अधिक्रमीत करुन आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णयः-

३. अनुसूचित क्षेत्रातील तेंदू व आपटा गोळा करणा-या गावातील ग्रामसभा आणि पंचायत कोणत्या पध्दतीने तेंदूपत्ता आणि आपटा यांची विल्हेवाट लावु इच्छिते यासाठी विचार विनिमय करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार ग्रामसभेचे आयोजन करावे.

महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ च्या तरतुदी व त्यामधील बदल, गौण वन उत्पादनाची व्याख्या या सर्व बाबी ग्रामसभेमध्ये सोप्या भाषेत समजावुन सांगाव्यात. (याबाबत ग्रामसभेत दयावयाच्या सूचनांचे प्रपत्र सोबत जोडले आहे.)

तेंदूपत्ता व आपटा संकलन व विक्री संदर्भात ग्रामसभेस खालील दोन पर्यायामधून एका पर्यायाची निवड करता येईल. यासाठी ग्रामसभेचे मत/ अभिप्राय ठरावाच्या स्वरुपात घेण्यात यावे. जसे की-

**पर्याय १.** महाराष्ट्र वन उत्पादन (व्यापाराचे विनियमन ), १९६९ व दि.९ जानेवारी २०१४ च्या अधिसूचनेन्वये ग्रामसभा वनविभागाच्या सेवा प्राप्त करुन घेऊन तेंदू व आपटा यांची विल्हेवाट करु शकते.

**किंवा**

**पर्याय २.** ग्रामसभा आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे तांत्रिक सहाय घेऊन तेंदू व आपटयाची विल्हेवाट स्वत: लावु शकतात.

ग्रामसभेने कोणताही ठराव मंजूर केला नाही तर ग्रामसभा तेंदू व आपटयाची विल्हेवाट त्यांच्या इच्छेनुसार स्वत: लावु इच्छिते असे समजण्यात येईल. (याबाबत ग्रामसभेने करावयाच्या ठरावाचे प्रपत्र सोबत जोडले आहे.)

## ४. जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती

पर्याय - १ किंवा २ ची अंमलबजावणी करत असतांना ग्रामसभा अथवा ग्रामसभेने नियुक्त केलेले प्रतिनिधी अथवा समितीच्या काही तक्रारी / अडीअडचणी असतील तर ते जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज करु शकतील.

**जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे असेल**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य वन संरक्षक (CCF) | सह-अध्यक्ष |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ४. उप वन सरंक्षक (DCF) | सदस्य |
| ५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प) | सदस्य सचिव |
| ६. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले ग्रामसभेचे तीन सभासद | सदस्य |
| ७. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले समाजिक संघटनेतील दोन प्रतिनिधी | सदस्य |

## ५. <u>ग्रामसभेने पर्याय -१ निवडल्यास खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.</u>

ज्या ग्रामसभा पर्याय एक निवडू इच्छितात अशा ग्रामसभांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित मुख्य वनसंवर्धन अधिकारी व उप वन संवर्धन अधिकारी यांना

उपलब्ध करुन दयावी व संबंधित वनअधिका-यांनी ग्रामसभेला तेंदू व आपटा यांच्या विल्हेवाटीसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

**ग्रामसभेमध्ये पर्याय -१** ची निवड केली तरीही तेंदू व आपटा यांची मालकी संबंधित ग्रामसभेकडेच राहील. तेंदु व आपटयाचे संकलन, विल्हेवाट या बाबींचे संनियंत्रण करण्यासाठी वनविभागा मार्फत होणा-या प्रक्रियेवर प्रतिनिधी नेमण्यास ग्रामसभा सक्षम असेल पेसा नियमानुसार साधन संपत्ती नियोजन व सनियंत्रण समिती हया समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत त्या समित्या देखील संपूर्ण प्रक्रियांचे नियंत्रण करेल. (वाचा पेसा नियम दि.४ मार्च २०१४ नियम २१ आणि ४१)

I. अनुसूचित क्षेत्रातील बहुतांश ठिकाणी वनक्षेत्राचे विभाजन गावनिहाय नाही. तसेच गावनिहाय तेंदू व आपटा पानांची विक्री करणे व्यापारिकदृष्टया परवडण्यासारखे (viable) ठरणार नाही. परिणामत: तसे केल्यास ग्रामसभांना मुबलक प्रमाणात आर्थिक फायदा होणार नाही. वन विभागाने तेंदू व आपटा पाने विक्रीसाठी निश्चित केलेले क्षेत्र घटक / घटक समुह या नावाने ओळखले जातात. मात्र या तेंदू घटक/घटक समुहाची भौगोलिक सीमा सुध्दा गावनिहाय नाहीत. एक घटक/घटक समुहात बरीच गावे अंतर्भुत असुन त्यातील तेंदू /आपटा वृक्षे सर्वसमान प्रमाणात आढळत नाहीत. वन विभागामार्फत गावनिहाय तेंदू विक्री होत नसल्याने वन विभागाकडे गावनिहाय तेंदू/आपटा उत्पादन व संकलन दर्शविणारी आकडेवारी उपलब्ध नाही. परंतू सदरची आकडेवारी तेंदूपाने संकलनकर्तानिहाय व संकलन केंद्रनिहाय (फडीनिहाय) उपलब्ध आहे. सदर माहितीच्या आधारावर extrapolation व्दारे गावनिहाय तेंदूपाने संकलनाचे प्रमाण (प्रमाण गोणीत) निश्चित करावे. यानंतर पर्याय १ निवडणारी जवळची गावे एकत्रित करुन तेंदूपानांचे व्यापारिकदृष्टया परवडणारे घटक व त्याचे उत्पादन (प्रमाण गोणीत) ठरविण्यात यावे. तेंदूपाने संकलन व विल्हेवाटीबाबत हे पहिले टप्पे असुन त्यासह पुढील टप्पे आणि त्याच्याशी निगडीत अपेक्षित निर्णय व निर्णय घेणारे प्राधिकारी **अनुसूची- १** मध्ये नमुद केल्याप्रमाणे निर्धारित करण्यात येत आहेत.

II. अनुसूचित क्षेत्रातील तेंदूपाने विक्रीपासुन मिळणारा महसुल संबंधित पंचायत/ग्रामसभा यांस वितरीत करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी "पेसा-तेंदु लेखा" या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत एक flexi account उघडावे. सदर लेखा, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य वनसंरक्षक यांनी नामांकित केलेल्या उपवनसंरक्षक यांच्या संयुक्त सहीने चालविले जाईल. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तेंदूपाने विक्रीपासुन प्राप्त झालेली निव्वळ रक्कम संबंधित ग्रामसभांस ग्रामसभा कोष खात्यात वितरीत करण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.**

III. जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती, आदिवासी समाजाचे हित लक्षात ठेवून वन विभागाने अवलंबिलेल्या पध्दतीत आवश्यक ते बदल करुन (Mutatis mutandis) तेंदू पत्त्याचे ई-लिलाव, संकलन, विक्री, विल्हेवाटी बाबत योग्य तो निर्णय घेईल, तथापि ग्रामसभेने पर्याय एक निवडल्यानंतर जर तेंदूपत्ता विकला गेला नाही तर त्यास समिती जबाबदार राहणार नाही.

**६. ग्रामसभेने पर्याय -२ निवडल्यास खालिल पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.**

I. ग्रामसभेने पर्याय २ निवडल्यास पेसा नियमानुसार ग्रामसभा तेंदूचा/आपटयाचा लिलाव करण्यास व विल्हेवाट लावण्यास सक्षम असेल.

II. यासाठी ग्रामसभेला वन विभाग व सर्व संबंधित विभाग सर्व प्रकारची तांत्रिक मदत करतील.

III. ग्रामसभा किंवा ग्रामसभेचा समुह ई- लिलावासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याची जिल्हाधिका-यांना विनंती करु शकेल.

IV. ज्या ग्रामसभा पर्याय-२ निवडतील त्या वाहतूक परवाना (Transit Permit) देण्यास सक्षम असतील.

V. स्थानिक वन अधिकारी हा साधन संपत्ती नियोजन व सनियंत्रण समिती (RPMC) चा सदस्य असुन त्याला मतदानाचा अधिकार नाही. ग्रामसभा सदर अधिका-याकडुन आवश्यक ती तांत्रिक मदत घेवू शकेल, याबाबत ग्रामसभेला जाणीव करुन दयावी/ माहिती दयावी.

VI. परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केलेली जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील समिती ग्रामसभांचा महासंघ स्थापन करण्याबाबत ग्रामसभांना प्रवृत्त करेल.

VII. लिलावामध्ये अडचण निर्माण झाल्यास अशा ग्रामसभांना जिल्हास्तरीय समिती आवश्यक ते सहकार्य करेल.

VIII. गावात आणि गावाच्या आजूबाजूच्या परिसरात तेंदू आणि आपटा यांच्या वापराची व्याप्ती ग्रामसभा निर्धारित करेल. या संदर्भात शेजारील गावाबरोबर व्याप्ती संदर्भात विवाद निर्माण झाल्यास संयुक्त ग्रामसभा बोलावुन विवाद मिटवण्यात यावा.

IX. तेंदू आणि आपटा तोडणे, गोळा करणे यासाठी स्थानिकांना प्रथम प्राधान्य देण्यात येत आहे याची ग्रामसभा खात्री करील.

७. सुयोग्य (लाभदायक) निर्णय घेण्यासाठी, संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी/पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी हे ग्रामसभांना योग्य ते मार्गदर्शन व मदत करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१७१२१४५३३१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.12.17 16:35:22 +05'30'

**(वि.गिरिराज)**
**शासनाचे प्रधान सचिव**

प्रत,

i. राज्यपालाचे सचिव,
ii. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
iii. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
iv. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
v. मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन,
vi. मा.प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई
vii. मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई
viii. सर्व विभागीय आयुक्त,
ix. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.
x. मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

xi. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

xii. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड. (जिल्हयातील सर्व तालुके)

xiii. निवडनस्ती, पं.रा.-२

## अनुसूची-एक

### पर्याय -१ साठी अपेक्षित कार्यवाही

| अ.क्र. | टप्पा | अपेक्षित कार्यवाही | **निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी** |
|---|---|---|---|
| १. | ग्रामसभांचे ठराव | पर्याय १ निवडणा-या ग्रामसभांचे ठराव मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेकडे पाठविणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| २. | तेंदू घटक प्रस्तावित करणे | पर्याय १ निवडणारी गावे योग्य संख्येत अंतर्भुत करुन व्यापारीकदृष्ट्या परवडणारे घटक निश्चित करणे | संबंधित उपवनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संयुक्तपणे |
| ३. | घटक निहाय तेंदूपाने उत्पादन निश्चित करणे ( Notified Yield ) | उपरोक्त परिच्छेद ५ मधील निर्देशानुसार घटकनिहाय तेंदूपानांचे उत्पादनाचे प्रमाण प्रस्तावित करणे | संबंधित उपवनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संयुक्तपणे |
| ४. | वरील (३) प्रमाणे प्रस्तावित केलेल्या घटकनिहाय उत्पादनास मंजुरी प्रदान करणे | घटकनिहाय तेंदूपाने उत्पादनाचे प्रमाणास मंजुरी देणे | संबंधित मुख्य वनसंरक्षक व जिल्हाधिकारी संयुक्तपणे |

| अ.क्र. | टप्पा | अपेक्षित कार्यवाही | **निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी** |
|---|---|---|---|
| ५. | घटकनिहाय अपेक्षित किंमत (Upset Price) प्रस्तावित करणे | ज्या किमान किंमतीत तेंदूपाने घटकाची विक्री व्यवहार्य आहे ती प्रस्तावित करणे | संबंधित उपवनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संयुक्तपणे |
| ६. | वरील (५) प्रमाणे प्रस्तावित अपेक्षित किंमतीस मंजुरी प्रदान करणे | अपेक्षित किंमतीस मंजुरी प्रदान करणे | संबंधित मुख्य वनसंरक्षक व जिल्हाधिकारी संयुक्तपणे |
| ७. | ई-निविदा प्रक्रिया | १.वन विभागात वापरात असलेल्या निविदाचे प्रारुपास शासन, महसूल व वन विभागामार्फत मान्यता देण्यात येते. त्याच प्रारुपात आवश्यक ते बदल करुन मान्यता देणे.<br>२.निविदा प्रसिध्द करणे व पुढील अनुषंगिक कार्यवाही करणे | ग्राम विकास विभाग<br>सध्या प्रचलित असलेल्या कार्यप्रणालीनुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालय. |
| ८. | विक्रीस मंजुरी प्रदान करणे | प्राप्त निविदा रक्कम प्रचलित बाजारभाव लक्षात घेवून अपेक्षित किंमतीशी (Upset Price) सुसंगत आहे याची खात्री करणे. | जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालील सदस्य असलेली समिती<br>१. जिल्हाधिकारी, अध्यक्ष<br>२.मुख्य वनसंरक्षक (CCF), सहअध्यक्ष<br>३.मुख्य कार्यकारी |

| अ.क्र. | टप्पा | अपेक्षित कार्यवाही | **निर्णय घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी** |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी, जिल्हा परिषद, सदस्य<br>४.संबंधित उपवनसंरक्षक, सदस्य<br>५.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, सदस्य-सचिव |
| ९. | विक्री किंमतीची विल्हेवाट | प्राप्त महसूलातून प्रशासनिक खर्च वजा करुन उर्वरित रक्कम “पेसा-तेंदु लेखा” या नावांने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी उघडलेले flexi account मध्ये वर्ग करणे. | संबंधित उपवनसंरक्षक |

## ठराव क्र.१-(पर्याय-१)

ज्याअर्थी महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ मध्ये मा.राज्यपाल महोदयांनी जारी केलेल्या दि.१९ ऑगस्ट २०१४ च्या अधिसुचनेअन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी तेंदू, बांबु आणि आपटयासह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी तेंदू पत्त्यांची नैसर्गिक टिकून राहण्याची क्षमता कमी आहे आणि तेंदू पाने अल्प कालावधीत गोळा केली जातात.

म्हणुन आम्ही ग्रामसभेचे मतदार, तेंदूपत्त्यांची/ आपटयाची खरेदी, वाहतुक आणि विल्हेवाट आमच्या वतीने करण्यासाठी महाराष्ट्र वन उत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९ आणि त्याअंतर्गत केलेले नियम व निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना याअंतर्गत **वनविभागाच्या सेवा प्राप्त करुन घेत आहोत.**

आम्ही, तेंदूपत्ता/ आपटा गोळा करुन अंतिम विल्हेवाट लावण्याच्या संपुर्ण प्रक्रियेचे नियंत्रण, पर्यवेक्षण करण्यासाठी ग्रामसभेतील/ साधन संपत्ती नियोजन व सनियंत्रण समितीतील खालील प्रतिनिधींची नियुक्ती करीत आहोत. ( ४ प्रतिनिधीपर्यत)

## ठराव क्र.२-(पर्याय-२)

ज्याअर्थी महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ मध्ये मा.राज्यपाल महोदयांनी जारी केलेल्या दि.१९ ऑगस्ट २०१४ च्या अधिसुचनेअन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी तेंदू, बांबु आणि आपटयासह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

म्हणुन आम्ही ग्रामसभेचे मतदारअसा ठराव करतो की, आमची ग्रामसभा तेंदूपत्त्यांची/आपटयाची खरेदी, वाहतुक आणि विल्हेवाट स्वत: करेल.

पुढे आम्ही असाही ठराव करतो की, वनविभाग आणि इतर सर्व संबंधित विभाग आवश्यक ते सर्व तांत्रिक व इतर सहाय्य ग्रामसभेला करण्याची मागणी करीत आहोत.

## ग्रामस्थांना आवाहन

अनुसूचित क्षेत्रातील वनांच्या हक्कासाठी मा.राज्यपाल महोदयांनी जारी केलेल्या दि.१९ ऑगस्ट २०१४ च्या अधिसूचनेअन्वये तेंदू, बांबु आणि आपटयासह सर्व गौण वनउपजांच्या मालकीचे अधिकार आपल्या ग्रामपंचायतीला व ग्रामसभेला दिलेले आहेत.

तेंदू व आपटा लिलावाबाबतचे सर्व काम वनविभागाकडून करण्यात येत होते हे आपल्याला माहित आहे.

तेंदूपत्त्यांची नैसर्गिक टिकून राहण्याची क्षमता कमी आहे आणि तेंदू पाने एप्रिल-मे या अल्प कालावधीत गोळा केली जातात. हेही आपल्याला माहित आहे. त्यामुळे यासाठी लिलाव प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करणे गरजेचे आहे.

तेंदू व आपटा लिलावाचा अधिकार ग्रामसभांना मिळाल्यामुळे ग्रामसभांनी याबाबत दोन पर्यायामधुन एक पर्याय निवडायचा आहे.

**पर्याय १.** महाराष्ट्र वन उत्पादन (व्यापाराचे विनियमन ), १९६९ व दि.९ जानेवारी २०१४ च्या अधिसूचनेन्वये ग्रामसभा वनविभागाच्या सेवा प्राप्त करुन घेऊन तेंदू व आपटा यांची विल्हेवाट करु शकते.

**किंवा**

**पर्याय २.** ग्रामसभा आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे तांत्रिक सहाय घेऊन तेंदू व आपटयाची विल्हेवाट स्वत: लावु शकतात.

ग्रामसभेने कोणताही ठराव मंजूर केला नाही तर ग्रामसभा तेंदू व आपटयाची विल्हेवाट त्यांच्या इच्छेनुसार स्वत: लावु इच्छिते असे समजण्यात येईल.

याबाबतचा शासन निर्णय आपल्याला, आपल्या विभागातील गटविकास अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) यांच्याकडे पहाता येईल.